महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

मंगळवारी बाजार, सदर, नागपूर – ४४०००१ (महाराष्ट्र राज्य)

(DTE CODE : 4012)

दुरध्वनी क्रमांक: (०७१२) २५६४४८३, फॅक्स क्रमांक : (०७१२) २५६२७४१

E-Mail : office.gpnagpur@dtmaharashtra.gov.in Website : www.gpnagpur.ac.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## WALK IN INTERVIEW शैक्षणिक वर्ष २०२६–२७

शासकीय तंत्रनिकेतन, सदर नागपूर येथील विविध विभागांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६–२७ करीता पूर्णपणे तात्पुरत्या स्वरुपात तासिका तत्वावर (Clock Hour Basis– CHB) अभ्यागत अधिव्याख्याता (Visiting Lecturer) या पदांची नेमणूक करावयाची आहे. पात्र व इच्छुक उमेदवारांसाठी थेट मुलाखतींचे (Walk in Interview) आयोजन संस्थेमध्ये करण्यात आले आहे. सविस्तर पात्रता निकष **www.gpnagpur.ac.in** संकेतस्थळावरील मुख्य नियमावलीत पहावेत.

| विविध विभाग | मुलाखतीचा दिनांक | वेळ |
|---|---|---|
| १. स्थापत्य अभियांत्रिकी , २. उपयोजित यंत्रशास्त्र ३. अणुविद्युत अभियांत्रिकी, ४. प्रवास व पर्यटन ५. धातूशास्त्र विभाग ६. मेकॅट्रॉनिक्स अभियांत्रिकी ७. विद्युत अभियांत्रिकी, ८. स्वयंचल अभियांत्रिकी ९. यंत्र अभियांत्रिकी, १०. संगणक अभियांत्रिकी ११. माहिती व तंत्रज्ञान १२. आर्टीफिशिअल इंटेलिजन्स (AIML) १३. खणिकर्म व खाण सर्वेक्षण विभाग, १४. वस्त्रनिर्माण अभियांत्रिकी, १५. पॅकेजिंग टेक्नालॉजी, १६. विज्ञान व मानविकी विकास (गणित), १७. विज्ञान व मानविकी विकास (इंग्रजी) | १६/०७/२०२६ | सकाळी ११.०० वाजता |

दिनांक : १३/०७/२०२६

प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर.

**१.** उमेदवारांनी मुलाखतीस उपस्थित राहताना सर्व मूळ कागदपत्रे, त्यांची स्वसाक्षांकित (Self-attested) छायाप्रती, अलीकडील पासपोर्ट आकाराचा फोटो तसेच संपूर्ण बायोडाटा/रेझ्युमे सोबत आणणे आवश्यक आहे.

**२.** निवड झालेल्या उमेदवारांना शैक्षणिक भारापोटी सैद्धांतिक तासिकेस ₹८००/- प्रति तास व प्रात्यक्षिक तासिकेस ₹४००/- प्रति तास या दराने मानधन अदा करण्यात येईल.

**३.** सदर नियुक्ती ही **शैक्षणिक वर्ष २०२६–२७** साठी पूर्णपणे **तात्पुरत्या (Visiting Lecturer)** स्वरूपाची असून, या नियुक्तीमुळे कायमस्वरूपी नोकरीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. तसेच, कोणतेही कारण न देता भरती प्रक्रिया बदलण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार संस्थेकडे राहील.

**४. किमान शैक्षणिक अर्हता:** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE) व महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित नियमांनुसार, **अभियांत्रिकी विषयांसाठी संबंधित शाखेतील प्रथम श्रेणीतील पदवी तसेच इंग्रजी व गणित विषयांसाठी संबंधित विषयातील प्रथम श्रेणीतील पदव्युत्तर पदवी** धारण केलेली असावी.

**५.** मुलाखतीकरिता संबंधित विभागात वेळेत हजर राहावे.